**<u>ठळक बातम्या</u>**

- पाकिस्तानविरोधातल्या धोरणाचा भाग म्हणून भारताकडून आयात आणि टपाल बंदी लागू / पाकिस्तानी जहाजांना भारतीय बंदरांमधे प्रवेश बंद

- भारत आणि अंगोला या देशांमध्ये कृषी, पारंपरिक औषधी आणि सांस्कृतिक क्षेत्रात करार

- वेव्हज् बाजारमधे गेल्या २ दिवसात एक हजार कोटीपेक्षा जास्त उलाढाल झाल्याची, माहिती आणि प्रसारण विभागाचे संयुक्त सचिव पृथुल कुमार यांची माहिती

**आणि**

- गोव्यात शिरगाव इथं लईराई देवीच्या जत्रेत झालेल्या चेंगराचेंगरीत सहा जणांचा मृत्यू, ८० जण जखमी

**<><><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तानच्या बाबतीत घेतलेल्या कठोर धोरणाचा भाग म्हणून विविध पावलं उचलली आहेत. त्याअंतर्गत पाकिस्तानकडून आयातीवर बंदी, पाकिस्तानी जहाजांना भारताच्या बंदरांमधे प्रवेशबंदी आणि परस्पर टपाल बंदी आजपासून लागू झाली. पाकिस्तानातून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या निर्यात झालेल्या किंवा वाटेत असलेल्या सर्व प्रकारच्या वस्तूंवर तात्काळ बंदी घातल्याची अधिसूचना परदेश व्यापार महासंचालनालयाने जारी केली आहे.

पाकिस्तानचा झेंडा लावलेल्या कोणत्याही जहाजाला भारतीय बंदरात प्रवेश बंद राहील असं बंदर, नौकानयन आणि जलमार्ग वाहतूक मंत्रालयाच्या अधिसूचनेत

म्हटलं आहे. हा निर्णयही तात्काळ लागू झाला असून पुढच्या सूचनेपर्यंत लागू राहील. भारतीय नौकानयन उद्योगाच्या सुरक्षेच्या दृष्टीनं  भारतीय जहाजांनी पाकिस्तानातल्या बंदरात जाऊ नये असं अधिसूचनेत म्हटलं आहे.

पाकिस्तानातून हवाई, सागरी किंवा खुष्कीच्या मार्गाने टपाल आणि पार्सल आणणं दूरसंचार मंत्रालयाने थांबवलं असून पाकिस्तानात पाठवण्याचं टपाल किंवा पार्सलही जाणार नाही असं स्पष्ट केलं आहे. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीनं हे निर्णय घेण्यात आले असून त्यातून सूट अथवा सवलत हवी असल्यास वेगळी परवानगी मागावी लागेल, आणि त्या त्या प्रकरणातल्या परिस्थितीनुसार त्याबाबत निर्णय घेतला जाईल असं सरकारी पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

तंटानिवारणासाठी मध्यस्थी हा प्रभावी पर्याय असून पंचायतीच्या स्वरुपात भारतात ही पद्धत पूर्वापार चालत आली आहे, असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सांगितलं. सर्वोच्च न्यायालयातर्फे लवाद आणि मध्यस्थीसंदर्भात आयोजित राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन आज नवी दिल्लीत राष्ट्रपतींच्या हस्ते झालं, त्यावेळी त्या बोलत होत्या. गावखेड्यांपर्यंत तंटे सोडवण्याचं कार्य शांततापूर्ण आणि सलोख्याच्या वातावरणात करता यावं याकरता अशी पर्यायी न्यायदान व्यवस्था आवश्यकता असल्याचं त्या म्हणाल्या. सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना, भावी सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई, केंद्रीय कायदेमंत्री अर्जुन राम मेघवाल आणि इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

**<><><><><>**

अंगोलाचे राष्ट्राध्यक्ष जोआओ मॅन्युएल गोन्साल्वेस लोरेंजो आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यात शिष्टमंडळ स्तरावर झालेल्या चर्चेनंतर आज दोन्ही देशांमध्ये कृषी, पारंपरिक औषधी आणि सांस्कृतिक क्षेत्रात अनेक करार करण्यात आले. परराष्ट्र

व्यवहार सचिव दम्मू  रवी यांनी नवी दिल्लीत एका वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. प्रधानमंत्री मोदी यांनी भारताकडून अंगोलाला भारतीय चलनात २० कोटी डॉलर्सची पत देऊ केली असून त्यानुसार अंगोला भारताकडून संरक्षण उपकरणांची खरेदी करणार आहे. यासाठी अंगोलाने भारतातल्या कंपन्यांशी चर्चा सुरु केली आहे, असं ते म्हणाले.

अंगोलाचे अध्यक्ष लॉरेंजो काल तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर नवी दिल्लीत आले असून राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पाहुण्यांच्या सन्मानार्थ आज राष्ट्रपती भवनात मेजवानी आयोजित केली आहे.

अंगोलाचे राष्ट्राध्यक्ष ३८ वर्षांनंतर भारत भेटीवर आले आहेत. भारत आणि अंगोला यावर्षी राजनैतिक संबंधांच्या स्थापनेचा ४० वा वर्धापन दिन साजरा करत आहेत. राष्ट्राध्यक्ष लॉरेंजो उद्या नवी दिल्ली इथं होणाऱ्या एका व्यवसायिक कार्यक्रमात सहभागी होतील. भारत आणि अंगोला दरम्यानचा व्यापार सातत्याने वाढत असून २०२३-२४ दरम्यान ४ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचला आहे. संयुक्त राष्ट्रांसह विविध बहुपक्षीय मंचांवर दोन्ही देश सोबत आहेत.

**<><><><><>**

कम्युनिटी रेडिओच्या देशभरात सुरु असलेल्या कार्याची, माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉक्टर एल मुरुगन यांनी प्रशंसा केली आहे. ते आज वेव्हज् परिषदेत कम्युनिटी रेडिओच्या उदघाटन सत्राला संबोधित करताना बोलत होते. सर्व कम्युनिटी रेडिओ काही उद्दिष्टांनी चालवली जात असून त्यामुळे आपल्या परंपरांना प्रोत्साहन मिळत आहे असं ते म्हणाले. कम्युनिटी रेडिओच्या कामकाजातून समर्पण आणि वचनबद्धता प्रतीत होत असल्याचं माहिती आणि प्रसारण सचिव संजय जाजू यावेळी म्हणाले.   दहाव्या राष्ट्रीय कम्युनिटी रेडिओ पुरस्कारांचं वितरण मुरुगन

यांच्या हस्ते यावेळी झालं. नवोन्मेष श्रेणीत महाराष्ट्रातल्या **येरळा वाणी** या कम्युनिटी रेडिओला राष्ट्रीय पातळीवर पहिला पुरस्कार प्रदान करण्यात आला.

येरळा वाणीला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्यानंतर आकाशवाणीशी बोलताना येरळा वाणीच्या केंद्र अधिकारी नीता जोशी म्हणाल्या.....

**होल्ड... बाईट - नीता जोशी (३६ सेकंद)....**

**<><><><><>**

मुंबईत भरलेल्या वेव्हज् परिषदेत माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री एल. मुरुगन यांनी आज **इंडियाज लाईव्ह इव्हेंट्स इकॉनॉमी - अ स्ट्रॅटेजिक ग्रोथ इम्पेरिटिव्ह** या श्वेतपत्रिकेचं अनावरण केलं. या श्वेत पत्रिकेत भारतातल्या वेगाने विस्तारणाऱ्या लाईव्ह या प्रकारच्या मनोरंजन उद्योगाचं व्यापक विश्लेषण देण्यात आलं आहे. या विश्लेषणात मनोरंजन क्षेत्रातले उदयोन्मुख प्रवाह, मनोरंजन क्षेत्राच्या वाढीसाठीचे पर्याय तसंच, सातत्याने उत्क्रांतीसाठी धोरणात्मक शिफारसींचा समावेश आहे. भारताच्या लाईव्ह इवेंट्स विभागाचा विस्तार १५ टक्क्यांनी वाढल्यामुळे गेल्यावर्षी अंदाजे १३ अब्ज रुपयांचा महसूल निर्माण झाल्याचंही या विश्लेषणात नमूद करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

वेव्हज् २०२५ च्या मंचावर वेव्हज् बाजारमधे गेल्या २ दिवसात एक हजार कोटी पेक्षा जास्त व्यवसाय संधी खुल्या केल्या आहेत. कालच्या दिवसात अडीचशे कोटी रुपयांची उलाढाल झाली तर आज दिवसभरात आठशे कोटी रुपयांचे व्यवहार होण्याची शक्यता आहे. माहिती आणि प्रसारण विभागाचे संयुक्त सचिव पृथुल कुमार यांनी सांगितलं की वेव्हज् २०२५ हा उपक्रम कल्पनेपलिकडे यशस्वी झाला आहे. दीड हजारापेक्षा जास्त प्रकल्पांची नोंदणी वेव्हज बाजार पोर्टलवर झाली असून त्यात ८ हजार खरेदीदार तर ४ हजार विक्रेते आहेत. ॲमेझॉन प्राईम व्हिडिओ

आणि कोरियन उद्योग CJ ENM तसंच अन्य मोठ्या उद्योगांनी या परिषदेदरम्यान महत्त्वाचे करार केले.असं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

आपल्या भारतीय निर्मितीतून नेटफ्लिक्सनं २ अब्ज अमेरिकन डॉलर्स एवढी आर्थिक उलाढाल केल्याचं नेटफ्लिक्सचे सह मुख्य कार्यकारी अधिकारी टेड सॅरंडोस यांनी सांगितलं आहे. ते आज वेव्हज परिषदेच्या 'स्ट्रीमिंग दि न्यू इंडिया: कल्चर, कनेक्टिव्हीटी अँड क्रिएटिव्ह कॅपिटल' सत्रात बोलत होते. देशातल्या काही प्रकल्पांमधून आपल्या कंपनीनं २० हजार कलाकार आणि रोजगार निर्माण केल्याची माहिती त्यांनी दिली भारतात चित्रपटांची महान संस्कृती असून इथल्या लोकांना चित्रपट पाहायला आणि त्यावर चर्चा करायला आवडतं असं आपलं निरीक्षण असल्याचं ते म्हणाले.

<><><><><>

गोव्यात शिरगाव इथल्या लईराई देवीच्या जत्रेत आज पहाटे झालेल्या चेंगराचेंगरीत सहा जणांचा मृत्यू झाला असून ८० जण जखमी झाले आहेत. देवळाच्या आवारात निखाऱ्यांवरून अनवाणी चालण्याच्या पारंपरिक कार्यक्रमासाठी आज पहाटे प्रचंड गर्दी झाली होती. यावेळी भाविकांमध्ये अचानक गोंधळ माजून ढकलाढकली झाली आणि अनेक जण एकमेकांच्या अंगावर पडून जखमी झाले. या घटनेची माहिती कळताच स्थानिक पोलीस आणि आपत्ती निवारण दल यांनी घटनास्थळी पोचून त्यांनी मदतकार्य सुरु केलं. जखमींना म्हापसा जिल्हा रुग्णालयात दाखल केलं असून गोव्याचे मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत यांनी रुग्णालयाला भेट देऊन जखमींची विचारपूस केली, तसंच त्यांच्या उपचारांचा पूर्ण खर्च सरकारतर्फे केला जाईल असं जाहीर केलं . अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेत झालेल्या जीवितहानीबद्दल दुःख व्यक्त केलं असून जखमींना लवकर बरं वाटावं अशी कामना

व्यक्त केली आहे. या कठीण प्रसंगात केंद्र सरकारचा गोवा सरकारला पूर्ण पाठिंबा असून आवश्यक ती सर्व मदत करण्यासाठी स्थानिक प्रशासन तत्पर असल्याची ग्वाही प्रधानमंत्र्यांनी दिली आहे.

<><><><><>

उत्तराखंडमध्ये चमोली जिल्ह्यातल्या बद्रीनाथ धामची कवाडं उद्या पहाटे सहा वाजता विधिवत उघडण्यात येतील. धार्मिक प्रथेनुसार, आदि गुरु शंकराचार्य यांच्या सिंहासनासह भगवान उद्धव आणि गरुड पालखी आज बद्रीनाथ धामला दाखल झाल्या. भगवान कुबेरांची पालखी बामनी गावातल्या नंदा देवी मंदिरात मुक्कामी असेल. बद्रिनाथ-केदारनाथ मंदिर समितीने १५ क्विंटर झेंडुच्या फुलांनी मंदिराची सजावट केली आहे.

<><><><><>

हवामान विभागानं उद्या ओदिशा, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल आणि सिक्कीम या राज्यांमध्ये उद्या ढगांच्या गडगडाटासह आणि वादळी वाऱ्यांसह पावसाचा इशारा दिला आहे. महाराष्ट्रामध्ये विदर्भात तसेच मध्य प्रदेश आणि छत्तीसगडमध्ये ६ मेपर्यंत पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

//<><><><><>//